ePaper

शरद पवारांच्या खेळीला पुतण्या अजितदादांचं चोख प्रत्युत्तर!



| वर्ष - 1 | अंक - 6 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 21 ऑगस्ट 2023 | सांगली आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- याला म्हणतात रिंकू सिंग!
- आयुषमानची डोकेदुखी वाढणार!
- अलिगडचे 'हरिगड' करण्याचे संकेत
- 'मिशन हॉस्पीटल' बनले निराधार

# शिराळ्यात नागपंचमी उत्साहात!

## » डीजेचा ठोका...अंबाबाईचा गजर अन भाविकांची प्रचंड गर्दी

। शिराळा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**डीजेचा ठोका...बँजोवर वाजणारी गाणी...अंबाबाईच्या नावाने चांगभलंचा गजर...सेलिब्रेटींचे खास आकर्षण आणि शिराळकरांच्या भक्तिमय वातावरणात नागपंचमीचा सण उत्साहात साजरा करण्यात आला.**

शिराळ्याची जगप्रसिद्ध आणि शेकडो वर्षाची परपंरा असणारी नागपंचमी यात्रा आंबाबाईच्या नावानं चांगभलंच्या गजरात हजारो भाविकांच्या उपस्थितीत उत्साहात आज (दि.२१) पार पडली. पावसाने उघडीप दिल्याने डीजेच्या ठेक्यावर तरूणाईने जल्लोष केला. ग्रामदैवत अंबामाता दर्शनासाठी सोमवारी पहाटे पाचपासून भाविकांनी रांगा लावल्या होत्या. अनेक वर्षे जिवंत नागाच्या पुजेची परपंरा जोपासणाऱ्या शिराळकरांनी कायद्याचे पालन करत जिवंत नागाऐवजी नाग प्रतिमेचे व घरोघरी मातीच्या नागाची पूजा करून नागपंचमी साजरी केली. कायद्याचे उल्लंघन होवू नये, यासाठी दोन दिवसांपासूनच पोलीस व वन यंत्रणा सज्ज होती. सकाळी 70 नागमंडळे, कार्यकर्ते विविध वाद्यांच्या ताफ्यासह प्रतिकात्मक नाग घेऊन ग्रामदेवता अंबामाता मंदिरात पोहोचले. त्या ठिकाणी पूजा झाल्यानंतर अंबामाताच्या दर्शनानंतर कार्यकर्ते आपल्या गल्लीत पोहचले. घराघरातून गृहिणींनी



भक्तिभावाने मातीच्या नागाची, लाह्या, दुर्वा, कापसाचे वस्त्र आदी साहित्यासह विधीवत पूजा केली.

दुपारी बाराच्या सुमारास पांडुरंग उर्फ प्रमोद महाजनांच्या घरात मानाच्या पालखीचे पूजन करण्यात आले. त्याचे पौरोहित्य बंडा जोशी यांनी केले. यावेळी कोतवाल, डवरी, भोई आदी मानकरी उपस्थित होते. यावेळी मानाच्या नागराज याचा मुखवटा आणि मानाचा सराफ यांनी दिलेल्या नाग प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर नाग प्रतिमेच्या मिरवणुकीला प्रारंभ झाला. मिरवणूक नायकूडपूरा येथून गुरूवार पेठ, कुरणे गल्ली, सोमवार पेठ आंबामाता रोडमार्गे काढण्यात आली.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त

»शिराळा शहरात व आंबामाता मंदिर परिसरात वन विभाग व पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मुख्य वनसंरक्षक रामनुजम, दिलीप भुरके, उपवनसंरक्षक नीता कट्टे, वनक्षेत्रपाल म्हतेश बगले यांच्या मार्गदर्शनाखाली १३५ अधिकाऱ्यांसह कर्मचारी नियुक्त केले होते. तसेच ३२ गल्ल्यांमध्ये प्रत्येक गल्लीसाठी ४ व उर्वरित ४ गल्ल्यांमध्ये १ पथक असे ६ पथके नियुक्ती केली होती. तसेच ७ ठिकाणी तपासणी नाके होते. ६० नागराज मंडळावर देखरेख ठेवण्यासाठी विशेष बंदोबस्त होता. पोलीस बंदोबस्तासाठी ५०० अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती केली होती. एक पोलीस उपअधीक्षक, १४ पोलीस निरीक्षक, ३५ सहायक पोलीस निरीक्षक, ६० महिला अंमलदार, ४४ वाहतूक पोलीस कर्मचारी, तर ३३० पोलीस पुरुष अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली होती. तर १६ व्हिडीओ कॅमेरे, १२ ध्वनी मापक यंत्रे, सीसीटीव्ही कॅमेरे ठेवण्यात आले होते.

### वैद्यकीय पथकांची खबरदारी

»आरोग्य विभागाने तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण पाटील व डॉ. एन. बी. कणसे यांच्या मार्गदर्शनाखाली ७ वैद्यकीय पथके व ३२ फिरती वैद्यकीय पथकांची सुविधा दिली होती. तसेच उपजिल्हा रुग्णालयात आपत्तकालीन वैद्यकीय पथक तैनात होते. नगरपंचायतीचे मुख्याधिकारी योगेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने योग्य व्यवस्था ठेवली होती.

# रासप सर्व जागांवर उमेदवार उभारणार!

## » राजकारण: पक्षाध्यक्ष महादेव जानकर यांचे विटा येथे प्रतिपादन

। विटा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजप प्रणित एनडीए आघाडी आम्हाला गृहित धरत नाही. काँग्रेस पक्ष हा गद्दार तर भाजप हा पक्ष महागद्दार आहे. हे सत्तेत येत नव्हते तेव्हा त्यांना जी दीड दोन टक्के मतांची गरज होती. त्यावेळी आमच्याशी युती करून ती दीड दोन टक्के मते मिळवून त्यांनी सत्ता हस्तगत केली. मात्र नंतर सत्तेचा घमंड त्यांच्या डोक्यात शिरला. चूक त्यांची नाही तर आमची आहे, असे स्पष्ट मत राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर यांनी व्यक्त केले. रासप आता प्रत्येक निवडणूकीत उमेदवार उभा करणार अशी माहिती देखील त्यांनी दिली.**

जनस्वराज्य यात्रेच्या निमित्ताने विटा (जी. सांगली) मध्ये राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष माजी मंत्री महादेव जानकर आले होते. या वेळी पत्रकारांशी ते बोलत होते. या वेळी माजी नगरसेवक शिवाजीराव



हारुगडे, रासपचे जिल्हाध्यक्ष अजित पाटील, बाळासाहेब मेटकरी, प्रणव हारुगडे, महेश मेटकरी, बबन हारुगडे आदी उपस्थित होते.

### काय म्हणाले जानकर?

**»यावेळी माजी मंत्री जानकर म्हणाले, एकनाथ शिंदे आणि अजितदादा बरोबर गेलेले सगळे लोक हे सत्ता गेल्यानंतर अजून कुठे जातील हे कळणारही नाही. मात्र सामान्य जनता शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांच्यासोबत असल्याचे दिसते. मी महाराष्ट्रभर फिरलो आहे. काँग्रेस पक्षाचे नेते शहाणपणाने वागले तर त्यांना चांगले दिवस येतील.**

**»जो तो त्याचा पक्ष वाढविण्याचा प्रयत्न करत आहे. आम्हालाही तेच करावे लागेल. म्हणून महाराष्ट्रभर फिरून जनतेत जाऊन मते आजमावत आहे.**

**»आम्हाला दोन्ही पक्ष सारखेच आहेत. कॉंग्रेसने त्या त्या काळात बिहार आणि उत्तरप्रदेशमध्ये प्रादेशिक पक्ष कमकुवत करण्याचा प्रयत्न केला होता. आता भाजपही तेच करीत आहे. त्यामुळे दोघांपासून समान अंतरावर राहून आमचा पक्ष वाढविण्याचा प्रयत्न सुरू आहे.**

# पुणे शहरात मेट्रोचे प्रवासी वाढले!

## फिडर सेवेला अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील 'मेट्रो'च्या दोन्ही मार्गांचा विस्तार झाल्यानंतर त्या मार्गावर पुरेशाप्रमाणात फीडर सेवा देण्यात सध्या तरी पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपी) कमी पडत आहे. काही मेट्रो स्थानकावरून 'पीएमपी'ने फीडर सेवा सुरू केली असली तरी बसची वारंवारिता एक-एक तासाला असल्यामुळे प्रवासी इतर वाहनांचा पर्याय निवडत आहेत. दिवसाला मेट्रोतून प्रवास करणारे फक्त दोन हजार प्रवासीच 'पीएमपी'तून प्रवास करीत आहेत.**

वनाझ ते रुबी हॉल क्लिनिक आणि पिंपरी चिंचवड ते सिव्हिल कोर्टदरम्यान एक ऑगस्टपासून 'मेट्रो' सेवेचा विस्तार झाला. 'मेट्रो' सेवेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. प्रवाशांना 'मेट्रो' स्थानकांपर्यंत जाण्यासाठी व तेथून घरी जाण्यासाठी पीएमपीने 'फीडर सेवा' सुरू केली आहे. 'फीडर सेवे'ची अगोदरपासूनच 'पीएमपी' प्रशासन तयारी करत होते.

'पीएमपी'कडून सध्या मेट्रो स्थानकापासून १४ फीडर सेवेचे मार्ग चालविले जात आहेत. 'मेट्रो'ची दैनंदिन प्रवासी संख्या ३० ते ४० हजारांपुढे गेली आहे, तर सुट्टीच्या दिवशी मेट्रोची प्रवासीसेवा एक लाखांच्या पुढे गेली होती. मात्र, 'पीएमपी'च्या 'फीडर' सेवेचे प्रवासी वाढण्यास तयार नाहीत.



### आकडे काय सांगतात?

- १४ फीडर सेवेसाठी पीएमपीचे मेट्रो स्थानकापासूनचे मार्ग
- २०३९३ एक ते १७ ऑगस्ट फीडर सेवेचे प्रवासी दोन लाख
- २१ हजार रुपये: एक ते १७ ऑगस्ट फीडर सेवेचे उत्पन्न
- २००० ते२३०० फीडर सेवेला दैनंदिन प्रवाशांचा प्रतिसाद

'पीएमपी'कडून १४ मार्गावर सुरू असलेल्या 'फीडर सेवे'तून दिवसाला दोन हजार ते २३०० प्रवासी मिळत आहेत. 'मेट्रो'तून प्रवास करणारे दहा टक्केसुद्धा प्रवासी 'पीएमपी'च्या फीडर सेवेचा लाभ घेत नाहीत. मेट्रोसाठी 'पीएमपी'ने फीडर सेवा सुरू केल्यानंतर आतापर्यंत बसमधून २० हजार ३९३ प्रवाशांनी प्रवास केला आहे. त्यामधून 'पीएमपी'ला दोन लाख २१ हजार रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. 'मेट्रो' स्थानकाच्या परिसरातून सुरू असलेली फीडर सेवा ५० मिनिटे ते एक तासाने आहे, तर 'मेट्रो'च्या फेऱ्या १० ते १५ मिनिटांनी सुरू असतात. मेट्रोतून बाहेर आलेल्या प्रवाशांना पीएमपीने प्रवास करण्यासाठी एक तास वाट पाहावी लागते.

त्यामुळे बहुतांश प्रवासी हे इतर पर्यायी वाहने प्रवास करतात. काही मेट्रो स्थानकावरून शेअर रिक्षा सेवा सुरू झाली असून त्याचा उपयोग नागरिक करत असल्याचे दिसून आले. पीएमपीची मेट्रो स्थानकापासून फीडर सेवा खूपच कमकुवत आहे. नागरिकांना बसची वाट पहात बराच वेळ थांबावे लागते. त्यामुळे प्रवासी पीएमपीचा पर्याय निवडत नाहीत. पीएमपीने छोट्या बसच्या माध्यमातून किमान २० ते ३० मिनिटांनी फीडर सेवा सुरू केल्यास प्रवासी नक्की वाढतील. अशी प्रतिक्रिया सुदर्शन साठे यांनी दिली. सिव्हिल कोर्ट मेट्रो स्टेशनवर पीएमपीची बराच वेळ वाट पहावी लागते. प्रवासी शेवटी वैतागून रिक्षाने निघून जातात. त्यामुळे येथून १० मिनिटाला बसची सोय पीएमपीने करावी. सुट्टीच्या दिवशी तर खूप प्रवासी असतात. मात्र, त्या प्रमाणे नियोजन दिसत नाही. असे सतीश गुदेंचा म्हणाले.

---

# पुण्यातील नीरा देवघर धरणही 'फुल्ल'

## देवघर धरणातून 750 क्युसेकने विसर्ग सुरू

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खडकवासला, पानशेत, कळमोडी धरणापाठोपाठ जिल्ह्यातील नीरा देवघर धरणही शंभर टक्के भरले आहे. पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला साखळी प्रकल्पात पावसाचा जोर ओसरल्याने धरणांमध्ये २६.६७ अब्ज घनफूट पाणीसाठा जमा झाला आहे.**



गेल्या काही दिवसांपासून धरण परिसरांत पावसाने विश्रांती घेतली होती. मात्र, दोन दिवसांपासून पावसाने पुन्हा हजेरी लावली असली, तरी प्रमाण घटले आहे. रविवारी दिवसभरात खडकवासला धरणक्षेत्रात चार मिलीमीटर, पानशेत, वरसगाव धरणात प्रत्येकी दोन मिलीमीटर आणि टेमघर धरणात सात मिलीमीटर पाऊस झाला. नीरा देवघर धरणात १०० टक्के पाणीसाठा जमा झाल्याने शनिवारी रात्रीपासून ७५० क्युसेकने विसर्ग करण्यात आला. जिल्ह्यातील वडिवळे धरणही शंभर टक्के भरले आहे. नीरा खोऱ्यातील भाटघर, गुंजवणी आणि वीर ही धरणे ७५ टक्क्यांपेक्षा अधिक क्षमतेने भरली आहेत. सोलापूर जिल्ह्याला पाणीपुरवठा करणाऱ्या उजनी धरणातील पाणीसाठाही वाढत आहे. सध्या या धरणात सात टीएमसी म्हणजेच १३.३२ टक्के पाणी जमा झाले आहे. पुणे जिल्ह्यातील भीमा खोऱ्यातील २६ धरणांमध्ये १२७.१६ टीएमसी म्हणजेच ६४ टक्के पाणीसाठा झाला आहे. 'टाटा'च्या मुळशी, ठोकरवाडी, शिरोटा, वळवण, लोणावळा, कुंडली या धरणांमध्ये सुमारे ३५.५६ टीएमसी पाणीसाठा झाला आहे.

### पाणीसाठा टक्के

- खडकवासला १.२४ ६२.९२
- पानशेत १०.६५ १००
- वरसगाव १२.०४ ९३.९३
- टेमघर २.७४ ७३.९८
- खडकवासला २६.६७ ९१.५१
- भामा आसखेड ६.४६ ८४.२५
- पवना ८.३२ ९५.७५

---

# पुणेकरांना 'गिफ्ट'



।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

प्रामाणिकपणे आणि वेळेत मिळकतकर (प्रॉपर्टी टॅक्स) भरणाऱ्या करदात्यांसाठी प्रोत्साहन म्हणून पुणे महापालिकेतर्फे राबविण्यात आलेल्या 'लकी ड्रॉ' योजनेत ४५ भाग्यवंत पुणेकरांना रविवारी बक्षिसे जाहीर झाली. पाच मिळकतकरधारकांना पेट्रोल कार आणि १५ व्यक्तींना इलेक्ट्रिक स्कूटर मिळणार आहेत. उर्वरित २५ जणांना लॅपटॉप, आयफोन आदी बक्षिसे जाहीर झाली आहेत.

महापालिकेतर्फे यंदा प्रथमच नियमित मिळकतकर भरणाऱ्यांना 'लकी ड्रॉ'द्वारे बक्षीस दिले जाणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. संपूर्ण वर्षभराचा मिळकतकर पालिकेने निर्धारित केलेल्या मुदतीत भरणारे मिळकतकरधारक त्यासाठी पात्र ठरणार होते. त्यानुसार सहा लाख ६० हजार ७८५ मिळकतकरधारक या सोडतीसाठी पात्र ठरले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या उपस्थितीत रविवारी दुपारी ऑनलाइन पद्धतीने सोडत काढण्यात आली. या वेळी महापालिका आयुक्त विक्रमकुमार, अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार आणि विकास ढाकणे आदी उपस्थित होते.

'एक लाखांहून अधिक रकमेचा मिळकतकर भरलेल्यांच्या गटामध्ये माजी नगरसेविका ज्योती गणेश कळमकर यांना पेट्रोल कारचे बक्षीस जाहीर झाले. याच गटात नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ आणि एका साडीच्या दुकानाला इलेक्ट्रिक स्कूटरचे बक्षीस जाहीर झाले आहे.

# मिरजेचे 'मिशन हॉस्पीटल' बनले निराधार!

## महात्मा गांधींपासून अनेकांना दिला वैद्यकीय सेवेचा आधार

। सांगली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**छत्रपती शाहू महाराज, महात्मा गांधींपासून राजे-महाराजे, नाट्य, चित्रपट, संगीत, सांस्कृतिक क्षेत्रातील दिग्गज हस्तींना, सामान्य माणसांना ज्या रुग्णालयाने वैद्यकीय सेवेचा आधार दिला ते 'मिशन' रुग्णालय आता अतिदक्षता विभागात दाखल झाले आहे.**

महाराष्ट्रच नव्हे तर देशभरातील वैद्यकीय क्षेत्रातील हे सुवर्णपान निखळण्याच्या मार्गावर आहे. 'मिशन इम्पॉसिबल' राबवत अनेकांना मरणाच्या दाढेतून काढणाऱ्या या महाकाय हत्तीला आता मरणाच्या दाढेतून कोण काढेल का, असा अस्वस्थ सवाल उपस्थित केला जात आहे.

कॅनेडियन मिशनरी डॉ. विल्यम वॉन्लेस यांनी मिरजेत १८९२ मध्ये स्थापन केलेल्या मिशन रुग्णालयामुळे देशभरात रुग्णसेवेबाबत मिरजेने नावलौकिक मिळविला. दिल्लीस्थित चर्च ऑफ नॉर्थ इंडियातर्फे संचलन करण्यात येणारे पाचशे खाटांची सोय असलेले वॉन्लेस रुग्णालय गैरव्यवस्थापन व रुग्णसंख्या कमी झाल्याने गेल्या दहा वर्षांत मोठ्या आर्थिक अडचणीत आले आहे.

सद्य:स्थितीत रुग्णालयावर कोट्यवधींचे कर्ज असून, त्यापैकी सुमारे २० कोटींवर कामगारांची देणी आहेत. सांगली, मिरजेसह राज्यातील अनेक नामांकित खासगी डॉक्टरांची मिशन हॉस्पिटल ही कर्मभूमी राहिली आहे. जागतिक पातळीवरील नामांकित कंपन्यांच्या मशिनरी, अतिउच्च दर्जाचे व्यवस्थापन, सेवा-सुविधा, दिलासादायी उपचार पद्धत यामुळे हे रुग्णालय एकोणीसाव्या शतकातच देशभर चर्चेत आले होते. असा ऐतिहासिक वारसा लाभलेले हे रुग्णालय रुग्णशय्येवर गेल्यानंतर त्याची सुश्रृषा करण्याची गरज आहे. आधार होते. दीडशे रुपयांचा केसपेपर, १२० रुपयांत एक्स-रे, १५० रुपयांत सोनोग्राफीसह माफक दरात इकोकार्डिओग्राफी, हजार ते दीड हजारात मिळणाऱ्या स्पेशल रुम्स यामुळे हे रुग्णालय सामान्यांसाठी मोठा आधार होते.



### वऱ्हांड्यात झोपत होते रुग्ण

» रुग्णालयाची ख्याती एकेकाळी अशी होती, की खाट फुल्ल झाल्यानंतर रुग्णांच्या इच्छेखातर वऱ्हांड्यात त्यांना गादी अंथरुण उपचार दिले जायचे. सध्यस्थितीत मात्र रुग्णालयाचे बहुतांश विभाग ओस पडले आहेत.

### स्वस्तातल्या सोयी

» महागड्या वैद्यकीय उपचारांनी त्रस्त असलेल्या सामान्य रुग्णांसाठी वानलेस रुग्णालय मोठा रुग्णालयाचे अंतरंग वानलेस रुग्णालय, डॉक्टर, कर्मचाऱ्यांची निवासस्थाने यासह मिरज परिसरात ४९ एकर जागेवर रुग्णालयाचा विस्तार आहे. रुग्णालयात सध्यस्थितीत ३६ वेगवेगळे अत्याधुनिक वैद्यकीय विभाग आहेत. एकाच छताखाली बहुतांश वैद्यकीय उपचार तसेच तपासण्यांची सोय या रुग्णालयात आहे. वैद्यकीय सेवेसह नर्सिंग, डीएमएलटी, फिजिओथेरपीचे शिक्षण देणाऱ्या संस्थाही रुग्णालयामार्फत चालविल्या जातात. एकूण ५०० बेडची सोय असलेले हे रुग्णालय आहे.

# सांगली जिल्ह्यात पुन्हा



। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

गेल्या वर्षी जिल्ह्यात लम्मीच्या प्रादुर्भावामुळे अनेक जनावरे दगावली होती. लसीकरणामुळे हा संसर्गजन्य आजार आटोक्यात आला होता. मात्र, आता जिल्ह्यात पुन्हा लम्पीचा शिरकाव झालेला असून, सध्या एक हजार २८९ जनावरांना 'लम्पी' बाधित आहेत. तसेच १०५ जनावरांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान, लम्पी आजार आटोक्यात आणण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने लसीकरण सुरु केले आहे. वाळवा, शिराळा, पलूस तालुक्यात सर्वाधिक लम्पी बाधित जनावरांची संख्या आहे. एप्रिल २०२३ ते आजअखेर दोन हजार ७५ जनावरं बाधित आहेत. त्यापैकी ६९१ जनावरं बरी झाली. रविवारी एका दिवसांत तब्बल २७७ जनावरं बाधित झाली आहेत. सध्या एक हजार २८९ जनावरं बाधित आहेत. बाधित जनावरांपैकी १०५ जनावरे दगावली आहेत. यामध्ये गाय ४६, बैल १५ आणि ४४ वासरांचा मृत्यू झाला. दरम्यान, तीन लाख २४ हजार गायवर्गीय जनावरांपैकी दोन लाख ११ हजार जनावरांचे लसीकरण पूर्ण झाले आहे. निरोगी जनावरांना बाधित जनावरांपासून वेगळे बांधावे, गायी व म्हशींना एकत्रित ठेवण्यात येवू नये, रोग सदृश लक्षणे आढळल्यास जवळच्या पशुवैद्यकीय संस्था प्रमुखांना तातडीने संपर्क साधावा. बाधित जनावरांच्या पिण्याच्या पाण्याकरिता व तसेच चराईकरिता स्वतंत्र व्यवस्था करावी, असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. किरण पराग यांनी केले.

# पोरांना स्टेजवर 'मॉडेल'च हवी : बनसोडे

## सांगलीत राज्यातले पहिले शाहिरी लोककला संमेलन

। वाटेगाव ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या रसिकांच्या मागणीवरून तमाशाचे स्वरूपच बदलले आहे. आजच्या पोरांना मॉडेल लागते. तिला नाचायला आले नाही, तरी चालते. आपली तमाशा कला, लोककला, शाहिरी जिवंत ठेवण्यासाठी मायबाप रसिकांनी प्रोत्साहन द्यायला हवे, अशी भावना राष्ट्रपती पदक विजेत्या, ज्येष्ठ तमाशा कलावंत मंगला बनसोडे यांनी व्यक्त केली.**

वाटेगाव (ता.वाळवा) येथील पहिल्या शाहिरी लोककला संमेलनाच्या उद्घाटन समारंभात त्या बोलत होत्या. अण्णा भाऊ साठेंच्या सून सावित्री साठे, नातू सचिन साठे, चळवळीचे नेते डॉ. भारत पाटणकर, रवींद्र बर्डे, प्रा. डॉ. बाबुराव गुरव, अंकल सोनवणे, शीतल साठे, महेंद्र रोकडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बनसोडे म्हणाल्या, अण्णा भाऊंकडून कथानक घ्यायचो. आम्ही बसवलेली फकिरा, कृष्णाकाठचा फरारी, आवडी, डोंगरची मैना अशी वगनाट्ये रसिकांनी डोक्यावर घेतली. रसिकांनी टीव्ही आणि सिनेमाबरोबर आम्हालाही प्रोत्साहन द्यायला हवे. डॉ. पाटणकर म्हणाले, शाहीर, लोक कलावंतांची वाटेगावात पंढरी करण्याचा प्रयत्न आहे. प्रा. डॉ. गुरव म्हणाले, शाहीर हा केवळ कलावंत नसून पुरोगामी विचारांचा कार्यकर्ताही आहे. सचिन साठे म्हणाले, सध्या चळवळी मारल्या जात असताना शाहिरी आणि लोककला टिकवावी लागेल. यावेळी महेंद्र रोकडे यांनी चळवळ पुढे नेण्याचे आवाहन केले. स्वागताध्यक्ष बर्डे म्हणाले, दरवर्षी लोकजागर वाटेगावमध्ये घेऊन साहित्याची पंढरी करू. यावेळी मुंबई विद्यापीठास अण्णा भाऊंचे नाव द्यावे असा ठराव केला. प्रारंभी अण्णा भाऊंच्या पुतळ्यास अभिवादन केले. याप्रसंगी धनाजी गुरव, प्रा. सचिन गरुड, प्रा. डॉ. शरद गायकवाड, विजय मांडके, सचिन माळी, प्रा.गौतम काटकर, सदाशिव निकम, रमेश बल्लाळ, रणजित कांबळे, आनंदा थोरात, अनिकेत मोहिते, जनार्दन साठे उपस्थित होते. जयंत निकम यांनी सूत्रसंचालन केले. योगेश साठे यांनी आभार मानले.



### 'पोटासाठी नाचते मी परवा कुणाची'

» मंगला बनसोडे यांनी 'पोटासाठी नाचते मी परवा कुणाची' ही लावणी सादर करून अनेकांच्या डोळ्याच्या कडा ओल्या केल्या. शीतल साठे यांनी 'माझी मैना' ही अण्णा भाऊंची छक्कड तसेच 'अण्णाभाऊंचे नाव द्या हो, मुंबई विद्यापीठाला' गीत सादर केले.

# जुनी पेन्शन शक्य आहे!




**केंद्र सरकारचे कर्मचारी आणि केंद्रिय सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांतील कर्मचाऱ्यांच्या रामलीला मैदानातील आंदोलनामुळे जुन्या पेन्शनचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. प्रसारमाध्यमे, वृत्तपत्रामध्ये याबद्दल मांडणी केली जात आहे, प्रतिक्रिया दिल्या जात आहेत. बहुतांश मते ही जुन्या पेन्शनच्या विरोधात आहेत. 'जुनी पेन्शन अव्यवहार्य आहे', 'राज्य सरकारे दिवाळखोर होतील'.**

'तिजोरीवरील ताण वाढणार', 'येणाऱ्या पिढ्यांवर ओझे' इत्यादी! या लेखात, या मुद्द्यांपेक्षा नक्कीच निराळे, म्हणजे जुन्या पेन्शनच्या बाजूने काही मुद्दे प्रस्तूत केले आहेत. अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना, एनडीए (राष्ट्रीय लोकशाही आघाडी) सरकारने सेवानिवृत्त सरकारी नोकरांसाठी राष्ट्रीय पेन्शन योजना म्हणजेच 'एनपीएस' नावाची नवीन पेन्शन प्रणाली सुरू केली. जानेवारी २००४ मध्ये त्याची अंमलबजावणी करण्यात आली. पुढे पश्चिम बंगाल वगळता सर्वच राज्यांनी ती योजना लागू केली. नवीन पेन्शन योजना (एनपीएस) लागू झाली तेव्हा, आर्थिक तज्ज्ञ आणि अर्थशास्त्रज्ञांनी असा युक्तिवाद केला होता की सरकारी कर्मचाऱ्यांना जुन्या योजनेच्या तुलनेत खूप मोठी पेन्शन मिळेल. पण हे आश्वासन उघडच खोटे असल्याचे सरकारी नोकरदारांना कळू लागले आहे. निवृत्त होताच कर्मचाऱ्यांचे मासिक उत्पन्न




झपाट्याने कमी होऊ लागले आहे. नवीन पेन्शन योजनेअंतर्गत भारतीय सेनेमधून १३ वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्याला पेन्शन म्हणून जुन्या योजनेअंतर्गत जितके मिळाले असते त्याच्या केवळ १५ टक्केच पेन्शन मिळाली. एका दुसऱ्या अधिकाऱ्याला रु. २,५०६ इतकीच पेन्शन मिळाली – वास्तविक, जुन्या योजनेअंतर्गत त्यांना रु. १७,१५० इतकी पेन्शन मिळाली असती. अशी बरीच उदाहरणे आहेत. नवी पेन्शन योजना ही शेअर बाजारावर अवलंबून असल्यामुळे त्यात कसलीही खात्री नाही. जुन्या आणि नवीन योजनेच्या पेन्शनच्या रकमांमध्ये प्रचंड तफावत आहे. त्यामुळेच विविध राज्य कर्मचारी आणि आता केंद्रीय कर्मचाऱ्यांनीसुद्धा आंदोलनाचा पवित्रा स्वीकारला आहे. जुन्या पेन्शनच्या विरोधात एक तर्क दिला जातो की, यामुळे सरकारांच्या तिजोरीवर ताण पडेल. राज्य सरकारांच्या अर्थसंकल्पाच्या जवळपास २५ टक्के इतका हिस्सा पेन्शनवरच खर्च होईल. हा तर्क दिशाभूल करणारा आहे. अर्थतज्ञ रोहित आझाद आणि इंद्रनील चौधरी यांनी दाखवून दिल्याप्रमाणे यात राज्य सरकारांच्या उत्पन्नाच्या तीन मार्गांचा म्हणजे केंद्र सरकार कडून मिळणारा वस्तू व सेवा करामधील ('जीएसटी'तील) तसेच प्रत्यक्ष करांतील वाटा, करांखेरीज अन्य प्रकारे मिळणारा महसूल, राज्यांना केंद्राकडून मिळणारी करांखेरीज अन्य अनुदाने यांचा यात समावेश केला गेला नाही. हे सारे एकत्र केल्यास जुन्या पेन्शनचा हिस्सा २५ टक्के नाही तर ११.७८ टक्के इतका असेल. यातदेखील राज्यांना केंद्राकडून मिळाणारा 'जीएसटी'चा वाटा वेळेवर मिळत नाही. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे, केंद्र सरकारच्या महसुलामध्ये सेस आणि सरचार्ज (उपकर आणि अधिभार) यांचा वाटा प्रचंड वाढला आहे. २०११-१२ मधील १०.४ टक्क्यांवरून २०२१-२२ मध्ये २६.७ टक्के इतका हा वाटा झाला आहे. सेस आणि सरचार्ज मधून मिळालेला महसूल 'सेंट्रल डिव्हिजिबल पूल'मध्ये गणला जात नसल्यामुळे याचा वाटा राज्यांना मिळत नाही. हा सगळा महसूल एकटे केंद्र सरकारच वापरते. थोडक्यात केंद्राची ही आर्थिक दादागिरी आणि राज्यांना वंचित ठेवण्याच्या क्लृप्त्या कमी झाल्या, तर राज्यांचे उत्पन्न आणखी वाढेल आणि 'राज्य उत्पन्नाच्या ११.७८ टक्के' हे प्रमाण आणखी कमी होईल. याव्यतिरिक्त चुकीच्या धोरणांमुळे केंद्र सरकारचे प्रत्यक्ष करांतून मिळणारे उत्पन्न घटले आहे. कॉर्पोरेट कर ३० टक्क्यांवरून २२ टक्के केला, नवीन उद्योगांसाठी तर फक्त १५ टक्केच, यांमुळे दरवर्षी रु. १.५ लाख कोटींचे नुकसान होत आहे. तसेच अरुण जेटली यांच्या अर्थमंत्री पदाच्या कार्यकाळात वेल्थ टॅक्स (श्रीमंती कर) रद्द करण्यात आला. या आणि अशा इतर मार्गांनी दिलेल्या करमाफीमुळे भारतात जीडीपीच्या तुलनेत करांतून मिळणाऱ्या उत्पन्नाचे प्रमाण (टॅक्स टू जीडीपी रेश्यो) कमी आहे. याबबतीत भारत विकसित तसेच बऱ्याच विकसनशील देशांच्याही मागे आहे. 'ओईसीडी'चे सदस्य असलेल्या ३८ देशांचा मिळून सरासरी टॅक्स टू जीडीपी रेश्यो ३४.१ टक्के आहे, त्यात मेक्सिकोसारख्या विकसनशील देशासाठीदेखील हा रेश्यो १७.९ टक्के आहे, तर भारताचा टॅक्स टू जीडीपी रेशिओ मात्र ११.७ टक्केच आहे.

## संपादकीय »

### चीनविरोधी तिघाडा..

***'केस कितीही सोनेरी रंगवले, किंवा नाकाला टोकदार आकार दिला तरी तुम्ही अमेरिकन वा युरोपियन बनू शकत नाही,' असे चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी मध्यंतरी म्हणाले होते.***

केस कितीही सोनेरी रंगवले, किंवा नाकाला टोकदार आकार दिला तरी तुम्ही अमेरिकन वा युरोपियन बनू शकत नाही,' असे चीनचे परराष्ट्रमंत्री वँग यी मध्यंतरी म्हणाले होते. त्यांचा रोख जपान आणि दक्षिण कोरियाच्या मुत्सद्द्यांकडे होता. चीन, जपान, दक्षिण कोरिया अशी त्रिपक्षीय चर्चा नव्याने सुरू करावी, असा आग्रह चीनने धरला होता. कारण त्याच्या या दोन तुलनेने चिमुकल्या शेजाऱ्यांना चुचकारण्यास अमेरिकेने सुरुवात केली होती आणि त्याचा सुगावा चीनला लागला. म्हणूनच मग ते सोनेरी केस, टोकदार नाक वगैरे शेलके चिनी टोमणे.. त्या देशाचे अध्यक्ष जो बायडेन, जपानचे पंतप्रधान फुमिओ किशिदा आणि दक्षिण कोरियाचे अध्यक्ष यून सुक योल यांची त्रिराष्ट्रीय शिखर परिषद नुकतीच कॅम्प डेव्हिड या अमेरिकी अध्यक्षांच्या ऐतिहासिक विश्रामस्थानी झाली. त्यांच्या एकत्रित निवेदनात चीनला स्पष्टपणे लक्ष्य करण्यात आले आहे.

**चांद्रयान-३ मोहीमेनंतर आता इस्रो सूर्याचा अभ्यास करण्यासाठी मोहीम सुरू करणार आहे. आदित्य-एल१' हा उपग्रह पीएसएलव्ही अग्नीबाणावरून अवकाशात झेप घेईल. हा उपग्रह सूर्याच्या जवळ जाणार नाही, तर चार महिने प्रवास करून पृथ्वीपासून १५ लाख कि.मी. अंतरावरील 'एल१' या बिंदूपाशी जाईल. तो भारताची अवकाशातील प्रयोगशाळा असेल. तिच्या मदतीनं आपला सूर्याचा अभ्यास सुरू होईल.**

# भारतीय संशोधकांना चंद्रानंतर आता सूर्यचे वेध!

भारताचं चांद्रयान-३ चंद्राच्या भूमीवर उतरलं की लगेचच, म्हणजे ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात किंवा सप्टेंबरच्या सुरुवातीला इस्रो (भारतीय अवकाश संशोधन संस्था) सूर्याचा अभ्यास करण्यासाठी आपली मोहीम सुरू करणार आहे. त्यासाठी 'आदित्य-एल१' हा उपग्रह पीएसएलव्ही अग्नीबाणावरून अवकाशात झेप घेणार आहे. अवकाशात गेल्यावर हा उपग्रह काही काळ पृथ्वीच्या भोवती फिरत राहून मोठ्या प्रवासासाठी आवश्यक ती गती मिळवेल आणि नंतर सूर्याच्या दिशेनं आपला प्रवास सुरू करेल. मात्र हा उपग्रह सूर्याच्या जवळ जाणार नाही, तर चार महिने प्रवास करून पृथ्वीपासून 15 लाख कि.मी. अंतरावरील 'एल1' या बिंदूपाशी जाईल. तिथं गेल्यानंतर हा उपग्रह आपलं काम करू लागेल. थोडक्यात, हा उपग्रह म्हणज भारताची अवकाशातील प्रयोगशाळाच असेल. तिच्या मदतीनंच आपला सूर्याचा अभ्यास करणं सुरू



होईल. सूर्याच्या जवळ न जाता (सूर्य आपल्या पृथ्वीपासून सरासरी 14.96 कोटी कि.मी. अंतरावर आहे.) दूरवरून सूर्याचा अभ्यास करण्यासाठीच एल१ या बिंदूपाशी हा उपग्रह एका ठराविक भ्रमणकक्षेत फिरत राहून आपलं काम करणार आहे. हा एल१ बिंदू म्हणजे 'लॅग्रांज पॉईन्ट'. या बिंदूचा शोध जोसेफ लुईस लॅग्रांज या फ्रेंच शास्त्रज्ञांनी १७७२ सालामध्ये लावला. त्याबाबत थोडक्यात असं सांगता येईल की मोठं वस्तुमान असणाऱ्या दोन गोष्टींमध्ये (इथं ग्रह किंवा तारा) एक लहान वस्तुमान असणारी वस्तू दोन मोठ्या वस्तुमान असणाऱ्या गोष्टींसह एकत्रितपणं, पण आपल्या ठिकाणीच राहून, प्रदक्षिणा घालू शकते, असं त्यानं सिद्ध करून दाखवलं. आपल्या सौरमालेमध्ये असे एकंदर पाच बिंदू आहेत. बिंदू आपल्याच सौरमालेत आहेत असं नाही, तर दोन मोठ्या वस्तुमान असणाऱ्या मालेमध्ये ते असतात. आदित्य-एल१ हा उपग्रह एल१ या बिंदूपाशी राहून आपलं काम करणार आहे. या बिंदूपाशी राहून काम करण्याचा सर्वांत मोठा फायदा म्हणजे आदित्य-एल१ या उपग्रहाला आपलं काम करताना कोणतेही अडथळे येणार नाहीत. पृथ्वीवर राहून सूर्याचा अभ्यास करताना ग्रहणाच्या वेळी किंवा पृथ्वीभोवतालच्या वातावरणामुळं किंवा अन्य कारणानं सूर्याचं सुस्पष्ट दर्शन होणं काहीवेळा अवघड होतं. सूर्याच्या अभ्यासामध्ये ती एक मोठीच अडचण असते. मात्र एल१ या बिंदूपाशी एका ठराविक भ्रमणकक्षेत फिरत राहून आपलं काम करताना आदित्य-१ एल या उपग्रहाला असे अडथळे येणार नाहीत. ठरल्याप्रमाणं हा उपग्रह सतत पाच वर्षं आपलं काम करत राहू शकेल.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पिंपरी विधानसभा कोणाच्या वाट्याला?

## राजकारण : भाजपा सोबत शिंदे, पवार यांच्या सत्तेतील सहभागाने गुंता वाढला

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपा आणि शिवसेनेच्या युतीवेळी पिंपरी विधानसभा शिवसेनेच्या वाट्याला सोडला जात होता. सध्या शिवसेनेच्या फुटीनंतर हा मतदारसंघ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला भाजपा कडून दिली जाण्याची शक्यता होती. मात्र आता उपमुख्यमंत्री अजित पवार देखील सत्तेत सहभागी झाले आहेत. त्यामुळे हा मतदारसंघ नेमका कोणाला द्यायचा, याचा गुंता वाढणार आहे. त्यामुळे गुडग्याला बाशिंग बांधलेल्या इच्छुकांना देखील नेमकी भूमिका घेणे कठीण होत आहे.**




राज्यात निर्माण झालेल्या सत्तेच्या गुंत्यामुळे त्याचा परिणाम स्थानिक पातळीवर विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उमटणार आहे. पिंपरी विधानसभेत हा गुंता मोठ्या प्रमाणात दिसण्याची शक्यता आहे. या मतदारसंघात राष्ट्रवादी विरोधात शिवसेना अशी लढत सातत्याने दिसली आहे. आमदार




अण्णा बनसोडे या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत आहेत. मात्र पुढची लढत नेमकी कोणामध्ये होणार या विषयी स्पष्टता नाही. कारण राज्यात भाजपा-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांची युती आहे. आमदार बनसोडे हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे समर्थक आहेत. त्यामुळे विद्यमान आमदार म्हणून अजित पवार यांच्या गटाला हा मतदारसंघ सोडला जाणार की शिवसेना दावा करणार या विषयी स्पष्टता नाही.

या मतदारसंघात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची मोठी ताकद आहे. त्यामुळे त्यांच्या गटाला जागा सोडल्यास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटातील पदाधिकारी नाराजी व्यक्त करण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे आमदार अण्णा बनसोडे यांनी शिंदेंच्या नेतृत्वात शिवसेनेची वाट धरल्यास राष्ट्रवादीला उमेदवाराचा शोध घ्यावा लागणार आहे. तर शिंदे गट विद्यमान आमदार असल्याने अण्णा बनसोडे यांच्या जागेसाठी हट्ट करतील हे नक्की. जागा वाटपाचा तिढा नंतर सुटणार असला तरी या गुंत्यामुळे पिंपरी विधानसभेत मोठ्या प्रमाणात बंडखोरीला चालना मिळणार हे सांगायला ज्योतिषाची गरज नाही.

### भाजपाचे इच्छुक नाराज...

शिवसेना महाविकास आघाडी सोबत गेल्यानंतर पिंपरी विधानसभेतून भाजपा एकला चलो रे च्या भूमिकेत निवडणूक लढविण्याची तयारी करत होते. मात्र दरम्यानच्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट सत्तेत सहभागी झाले. त्यामुळे तीन पैकी एक विधानसभा शिंदे यांच्या गटाला सोडावा लागेल अशा चर्चा राजकीय वर्तुळात रंगत आहेत. त्यामुळे विधानसभेसाठी तयारी करणाऱ्या भाजपाच्या इच्छुकांचा हिरमोड झाल्याचे दिसते.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाला उमेदवाराची प्रतीक्षा...

पिंपरी विधानसभा मतदारसंघ आरक्षित आहे. युतीमध्ये दोन मतदारसंघ भाजपाकडे असल्याने एक आपल्याकडे घेण्यासाठी शिंदे गट आग्रही आहे. त्यासाठी या मतदारसंघात योग्य आणि सक्षम उमेदवाराचा शोध मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गट घेताना दिसत आहे. आमदार अण्णा बनसोडे यांच्या राष्ट्रवादीतील नाराजीचा फायदा उठवीत त्यांना आपल्याकडे खेचण्यासाठी गळ टाकण्याचा देखील सातत्याने प्रयत्न होत आहे.

---

# पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय लोकाभिमूख करू!

## पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे : पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याहस्ते सत्कार

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय लोकाभिमुख करण्यासाठी आम्ही पूर्णपणे प्रयत्न करू. पिंपरी-चिंचवड शहरात असणाऱ्या अडचणी पहिल्या पोलीस आयुक्तांपासून माझ्यापर्यंत सर्वांनी सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. पोलीस आणि जनता वेगळे नाही. नागरिकांनी आमचे डोळे आणि कान बनावे. नागरिक दोन पावले पुढे आले तर आम्ही चार पावले पुढे येऊन शहरातील गुन्हेगारी नेस्तनाबूत करून टाकू, असे प्रतिपादन पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी केले.**




पिंपरी-चिंचवडचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांना वैशिष्ट्यपूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले. त्याबद्दल पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयुक्त चौबे यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. आकुर्डी येथील ग. दी. माडगूळकर सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. या वेळी सत्काराला उत्तर देताना पोलीस आयुक्त चौबे बोलत होते.

कार्यक्रमासाठी पालकमंत्री चंद्रकांत पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार अश्विनी जगताप, आमदार अण्णा बनसोडे, आमदार उमा खापरे, महापालिका आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, पीएमआरडीए आयुक्त राहुल महिवाल, विवेक खरवडकर, सह पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष पांडुरंग सांडभोर, सरचिटणीस सुकृत मोकाशी आदी उपस्थित होते.

> पिंपरी-चिंचवडने दिलेले प्रेम आणि आपुलकी मी आयुष्यभर विसरू शकणार नाही. माझ्या पुरस्काराचा प्रस्ताव मुंबईत असताना दोन वेळा गेला होता. पण पिंपरी-चिंचवड शहरात आल्यानंतर त्याबाबतचे पदक जाहीर झाले. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहर माझ्यासाठी लकी आहे. जाईल.
>
> **- विनयकुमार चौबे,**
> पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड

---

# चिंचवड महापालिकेचा गजब कारभार!

## क्रीडांगणाचे आरक्षण बदलले

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।



पिंपरी चिंचवड महापालिकेने क्रीडांगणासाठी असलेले आरक्षण बदलून ते अश्वारोहणासाठी केले आहे. हे पूर्णतः चुकीचे असून बदललेले आरक्षण रद्द करून क्रीडांगणासाठी पूर्ववत आरक्षित करावे, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला शहराध्यक्ष कविता आल्हाट यांनी केली आहे. आयुक्त शेखर सिंह यांच्याकडे निवेदनाद्वारे आल्हाट यांनी ही मागणी केली.

कविता आल्हाट यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, प्रभाग क्रमांक २ ( जाधववाडी बोऱ्हाडेवाडी ) मध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विकास आराखड्यानुसार आरक्षण क्रं १/१३७ अन्वये खेळाचे मैदान / क्रीडांगणाचे आरक्षण आहे. सदर जागेस कुंपण घालण्यात आले आहे. शेजारी असणाऱ्या मोठ्या प्रमाणावरील गृहप्रकल्पातील लोकवस्तीमधील खेळाडू, विद्यार्थी या क्रीडांगणावर खेळण्यासाठी येत असतात. खेळाडूंकडून क्रिकेटच्या स्पर्धा भरविल्या जातात. तर अनेक जेष्ठ नागरिक, महिला व्यायाम व तंदुरुस्तीसाठी फिरण्यासाठी क्रीडांगणावर येतात. असे असताना देखील क्रीडांगणाचे हे आरक्षण बदलून त्या ठिकाणी अश्वारोहणासाठी आरक्षण जाहीर केले आहे. त्यानुसार कार्यवाही देखील केली जात आहे.

सर्वसामान्यांसाठी उपयुक्त असणारे एक क्रीडांगण अश्वारोहणासाठी देणे चुकीचे आहे. तरी मनपा प्रशासनाने याची दखल घेऊन आरक्षण पुर्ववत क्रीडांगणाचे करावे. सामान्य नागरिकांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा प्रशासनाविरोधात मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अल्हाट यांनी दिला.

# अलिगडचे नाव 'हरिगड' करण्याचे संकेत

## केशव मौर्य यांनी शहा-योगींच्या उपस्थितीत केला उल्लेख

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अलिगडमध्ये सोमवारी माजी मुख्यमंत्री कल्याण सिंह उर्फ बाबूजी यांना दुसऱ्या पुण्यतिथीनिमित्त आदरांजली वाहण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांच्या उपस्थितीत कार्यक्रम झाला. यावेळी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथही उपस्थित होते. पण या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री केशव मौर्य या दोन्ही दिग्गजांच्या दोन पावले पुढे गेले आणि त्यांनी थेट अलिगडचे नाव बदलण्याचेच संकेत दिले.**

केशव मौर्य यांची बोलण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी सर्वप्रथम जय श्री रामची घोषणा दिली. एवढेच नाही तर प्रचंड गर्दी असलेल्या या कार्यक्रमात त्यांनी अलिगडचे नाव बदलण्याचे संकेतही दिले. केशव म्हणाले, "हरिगडच्या लोकांनी... म्हणा, जय श्री राम... बाबूजींचे स्वप्न अयोध्येत पूर्ण होत आहे. यापेक्षा मोठे दुसरे काहीही असू शकत नाही. गृहमंत्री अमित शहा म्हणाले, "मागासांसाठी काम करणाऱ्या दिवंगत बाबूजी कल्याण सिंह यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी मी दिल्लीहून आलो आहे. तो काळ असा होता की, अयोध्येत रामभक्तांची गर्दी होत होती. सेवकांना थांबवायचे होते त्यावेळी बाबूजींनी गोळी न चालवण्याची भूमिका घेतली. त्यांनी मुख्यमंत्रिपद सोडण्याचा निर्णय घेतला, हा मोठा त्याग होता. शहा म्हणाले, "बाबूजींना गरीब आणि दलितांबद्दल अपार करुणा होती. ज्या दिवशी पीएम मोदींनी अयोध्येत राम मंदिराचे भूमिपूजन केले. मी बाबूजींना फोन करून सांगितले. त्यांनी उत्तर दिले की माझे जीवन धन्य झाले. ते म्हणाले, "पीएम मोदींनी मागासवर्गीयांसाठी



जास्त काम केले. ते NEET परीक्षेत ओबीसी आरक्षण देण्याचे बोलले. आता सांगा भाजपला 80 जागांवर जिंकवणार की नाही? विजयाचा संकल्प घ्या योगी म्हणाले, "जेव्हा पहिल्यांदा भाजपचे सरकार स्थापन झाले, तेव्हा लोकांना सुशासन कसे असते हे कळले. 1991 मध्ये कल्याण सिंह यांनी अलीगढला नवी ओळख देण्यासाठी स्वतंत्र तालानगरी स्थापन केली. मला आनंद आहे की 2017 मध्ये ही ओळख जागतिक स्तरावर पोहोचली आहे. ते म्हणाले, "स्वर्गीय कल्याण सिंह यांना आज समाधान वाटत असेल. ज्या कामासाठी मी 1992 मध्ये सरकार सोडले ते काम पूर्ण झाले आहे, राम मंदिर बांधले आहे. आज आपण बाबूजींच्या पुण्यतिथीला एकत्र आलो आहोत." डबल इंजिन सरकारने बाबूजी कल्याण सिंह यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त पहिल्या कॅन्सर संस्थेला त्यांचे नाव दिले. त्यांच्या स्मृतीस मी आदरांजली अर्पण करतो. केंद्रातील सत्तेसाठी होणा-या लोकसभा निवडणुकीत सर्वात महत्त्वाची भूमिका उत्तर प्रदेशची आहे. यूपीमध्ये लोकसभेच्या 80 जागा आहेत आणि असे मानले जाते की देशातील सत्तेचा मार्ग उत्तर प्रदेशातूनच जातो. त्यामुळेच दिल्लीत सत्ता मिळवण्यासाठी पक्षांनी यूपीमध्ये सर्वाधिक जोर लावला आहे. उत्तर प्रदेशात गेल्या दोन लोकसभा निवडणुकांमध्ये भाजपचा रेकॉर्ड चांगला राहिला आहे. 2014 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने यूपीमध्ये 80 पैकी 71 जागा जिंकल्या होत्या.

### बाबूजी विचार करत असतील

» योगी म्हणाले, "जेव्हा पहिल्यांदा भाजपचे सरकार स्थापन झाले, तेव्हा लोकांना सुशासन कसे असते हे कळले. 1991 मध्ये कल्याण सिंह यांनी अलीगढला नवी ओळख देण्यासाठी स्वतंत्र तालानगरी स्थापन केली. मला आनंद आहे की 2017 मध्ये ही ओळख जागतिक स्तरावर पोहोचली आहे. ते म्हणाले, "स्वर्गीय कल्याण सिंह यांना आज समाधान वाटत असेल. ज्या कामासाठी मी 1992 मध्ये सरकार सोडले ते काम पूर्ण झाले आहे, राम मंदिर बांधले आहे. आज आपण बाबूजींच्या पुण्यतिथीला एकत्र आलो आहोत." डबल इंजिन सरकारने बाबूजी कल्याण सिंह यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त पहिल्या कॅन्सर संस्थेला त्यांचे नाव दिले. त्यांच्या स्मृतीस मी आदरांजली अर्पण करतो.

# रोमिओ-ज्युलिएट कायद्याबाबत याचिका

## सहमतीने शारीरिक संबंधांना गुन्हा समजू नये

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अल्पवयीन मुलांमध्ये सहमतीने लैंगिक संबंधांना अपराधाच्या श्रेणीतून वगळण्यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. यावर न्यायालयाने केंद्राची भूमिका विचारली आहे. साधारणपणे या रोमियो-ज्युलिएट कायदा म्हणतात, आणि तो जगातील अनेक देशांमध्ये लागू आहे**

याचिकेत दावा करण्यात आला आहे की, अल्पवयीन (18 वर्षाखालील) त्यांच्या स्वत:च्या इच्छेने शारीरिक संबंध ठेवतात, परंतु कायदेशीरदृष्ट्या हा गुन्हा आहे. हा बलात्काराच्या श्रेणीत येतो. कायद्यानुसार, मुली गरोदर राहिल्यावर अनेक प्रकरणांमध्ये मुलगा शिक्षेस पात्र ठरतो. पालक तक्रार घेऊन पोलिसांत जातात. वकील हर्ष विभोर सिंघल यांनी ही जनहित याचिका दाखल केली आहे. अल्पवयीन मुलांमधील लैंगिक संबंधांच्या बाबतीत बलात्काराशी संबंधित कायद्याला आव्हान त्यात दिले आहे. याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय महिला आयोग, कायदा आणि न्याय मंत्रालय तसेच गृह मंत्रालयाला नोटीस बजावली आहे. याचिकेत अशी मागणी करण्यात आली आहे की, सर्वोच्च न्यायालयाने कलम 32 किंवा कलम 142 अंतर्गत अधिकारांचा वापर करून 16 ते 18 वर्षांच्या वयोगटातील संमतीने लैंगिक संबंध ठेवणाऱ्यांना गुन्हेगाराच्या श्रेणीतीन वगळावे. किशोरवयीन मुलांमध्ये धोका लक्षात घेऊन योग्य निर्णय घेण्याची क्षमता असते, असा युक्तिवाद याचिकेत करण्यात आला आहे. बऱ्याच देशांमध्ये लागू असलेला रोमिओ-ज्युलिएट कायदा अल्पवयीन मुलांमधील संबंधांना जर ते सहमतीने असेल आणि वयातील फरक कमी असेल तर संरक्षण प्रदान करतो, उदाहरणार्थ, फ्रान्समध्ये, सहमतीने संबंधांचे वय 15 वर्षे आहे. जपानमधील तरुणांचे मत घेतल्यानंतर वय 13 वरून 16 करण्यात आले आहे. चीनमध्ये 14 वर्षे तर ब्रिटनमध्ये 16 वर्षे आहे. मुलांचे लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण करण्यासाठी POCSO (द प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रन फ्रॉम सेक्शुअल ऑफेन्स ऍक्ट, 2012) देशात लागू आहे.



### परदेशात काय आहे कायदा

» बऱ्याच देशांमध्ये लागू असलेला रोमिओ-ज्युलिएट कायदा अल्पवयीन मुलांमधील संबंधांना जर ते सहमतीने असेल आणि वयातील फरक कमी असेल तर संरक्षण प्रदान करतो, उदाहरणार्थ, फ्रान्समध्ये, सहमतीने संबंधांचे वय 15 वर्षे आहे. जपानमधील तरुणांचे मत घेतल्यानंतर वय 13 वरून 16 करण्यात आले आहे. चीनमध्ये 14 वर्षे तर ब्रिटनमध्ये 16 वर्षे आहे.

# कोविडमधून बरे झालेले लसीमुळे वाचले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (ICMR) च्या नवीन अभ्यासात असे म्हटले आहे की खबरदारीच्या लसीकरणामुळे कोरोना रुग्णांच्या डिस्चार्जनंतर मृत्यूमध्ये 60% घट झाली. दुसऱ्या शब्दांत, ज्या लोकांना कोरोना संसर्ग होण्याआधी लसीकरण करण्यात आले होते त्यांना संक्रमणानंतर दीर्घकाळापर्यंत कोविड लक्षणांपासून 60% संरक्षण मिळाले. खरं तर, जे रुग्ण कोरोनातून बरे झाले किंवा कोविड-19 निगेटिव्ह आले त्यांना काही महिन्यांनंतरही कोरोनाची लक्षणे जाणवली.

त्याला लॉंग कोविड म्हणतात. लॉंग कोविड हा शब्द प्रथम अलिसा पेरेगो (संशोधन सहयोगी, युनिव्हर्सिटी कॉलेज लंडन) यांनी मे 2020 मध्ये त्यांचा कोविड-19 अनुभव शेअर करताना वापरला होता. तेव्हापासून अनेक रुग्णांनी असेच अनुभव कथन केले आहेत. नॅशनल क्लिनिकल रजिस्ट्री फॉर कोविड-19 च्या टीमने रुग्णांना डिस्चार्ज दिल्यानंतर एक वर्षानंतर कोरोना संसर्गामुळे झालेल्या मृत्यूंच्या आकडेवारीचे विश्लेषण करून हा अभ्यास केला. ICMR देशभरातील 31 केंद्रांवर कोविड-19 साठी राष्ट्रीय क्लिनिकल रजिस्ट्री सांभाळत आहे. रुग्णालयात दाखल असलेल्या सर्व कोरोना रुग्णांना डिस्चार्ज मिळाल्यानंतर एक वर्षापर्यंत वेळोवेळी कॉलवर संपर्क साधला जातो. या अभ्यासात फेब्रुवारी 2023 पर्यंत गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले लॉंग कोविडशी लढणाऱ्या दोन व्यक्तींची लक्षणे पूर्णपणे भिन्न असू शकतात. तथापि, एक सामान्य लक्षण म्हणजे थकवा. सांधेदुखी, स्नायू दुखणे, ऐकणे आणि दृष्टी समस्या, डोकेदुखी, वास आणि चव कमी होणे. यासोबतच आतडे, किडनी, फुफ्फुस आणि हृदयाला होणारे नुकसान देखील संबंधित समस्या आहेत.

# रेखा वनिताने अमेरिकेत कापला बर्थडे केक!

महाराष्ट्राची हास्यजत्रा हा शो सध्या चांगलाच गाजतोय. महाराष्ट्राची हास्यजत्रा हा शो पुन्हा एकदा सोनी मराठीवर सुरु झालाय. सहकुटुंब हसूया या टॅगलाईन खाली महाराष्ट्राची हास्यजत्रा पुन्हा सुरु झालाय. प्रेक्षकांचे लाडके कलाकार पुन्हा एकदा प्रेक्षकांना खळखळुन हसवायला सज्ज आहेत. हास्यजत्रेतील कोळीवाड्याची रेखा म्हणुन ओळख असलेली वनिता खरात हिचा काहीच दिवसांपुर्वी वाढदिवस झाला. त्यानिमित्ताने वनिताने सोशल मिडीयावर पोस्ट केलीय.वनिताने सोशल मिडीयावर एक व्हिडीओ शेअर केलाय. यात वनिता खरातने नुकत्याच झालेल्या वाढदिवसानिमित्त खास पोस्ट शेअर केलीय. वनिता लिहीते, "या वर्षीचा माझा वाढदिवस खूप विशेष होता,कारण दीड दिवस माझा वाढदिवस साजरा झाला तोही ३ देशांमध्ये अमेरिका , कॅनडा आणि भारत... तोही माझ्या लाडक्या माणसांबरोबर! इतक्या जल्लोषात आणि उत्साहात, इतक्या वेगवेगळ्या गोष्टी बघत माझा वाढदिवस साजरा होईल असं खरंच वाटलं नव्हतं. प्रेक्षकांच्या प्रेमाची ताकद मला आज इथवर




घेऊन आली, आणि माझ्या मित्रांनी या वाटेवर माझी सोबत केली. घरच्यांच्या शुभाशीर्वादाने मला मार्ग दाखवला आणि नाजूक क्षणात सुमित ने माझा हात धरला!वनिता पुढे लिहीते.. "इतके प्रचंड देश पाहताना, तिथलं सौंदर्याने भारावून जाताना आणि प्रत्येक केक कापताना, सुमित ची मात्र प्रचंड आठवण आली. मी तिथे असताना भारतात वाढदिवस साजरा करण्याची धुरा सुमित ने सांभाळली, आणि शुभेच्छा ही माझ्या पर्यंत पोचावल्या.

# आयुषमानची डोकेदुखी वाढणार!

गदर २ आणि ओएमजी २ मध्ये सनीच्या गदर २ ने बाजी मारली आहे. या चित्रपटानं पाचशे कोटींच्या दिशेनं वाटचाल सुरु केली आहे.आतापर्यत गदर २ ने साडेतीनशे कोटींपेक्षा जास्त कमाई केल्याचे दिसून आले आहे. यात ओएमजीनं देखील शंभर कोटींचा टप्पा ओलांडला आहे.ऑगस्ट महिना हा बॉलीवूडसाठी खूपच इंटरेस्टिंग ठरताना दिसतो आहे. या महिन्यात आतापर्यत रजनीचा जेलर, सनीचा गदर २ आणि अक्षयचा ओएमजी २ प्रदर्शित झाला आहे. येत्या आठवड्यात आयुषमान खुरानाचा ड्रीम गर्ल २ प्रदर्शित होणार असून त्यामध्ये आयुषमान खुरानाची प्रमुख भूमिका आहे. आयुषमानच्या यापूर्वीच्या ड्रीम गर्ल भाग १ ला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाल्याचे दिसून आले होते.आता आयुषमानसाठी चिंतेची बाब म्हणजे त्याला सनी देओलचा गदर २ आणि अक्षयच्या ओएमजी २ सोबत फाईट द्यावी लागणार आहे. वास्तविक आयुषमानच्या चित्रपटाचा जॉनर पूर्णपणे वेगळा आहे. कॉमेडी प्रकारात मोडणाऱ्या या चित्रपटाच्या गाण्याला आणि ट्रेलरला प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. गेल्या काही दिवसांपासून प्रेक्षक आयुषमानच्या या चित्रपटाची आतूरतेनं वाट पाहत होते.दुसरीकडे असे ऐकायला मिळते आहे की, आयुषमानच्या नव्या चित्रपटाची आगाऊ बूकींगही जोरात होताना दिसत आहे. अशातच दोन तगड्या अभिनेत्यांचे आव्हानही आयुषमानुपुढे असणार आहे. त्यामुळे एकुणच या चित्रपटाचा माहोल अद्याप तयार झालेला दिसून येत नसल्याचे नेटकऱ्यांचे म्हणणे आहे. दुसरी गोष्ट म्हणजे सध्या गदर २ आणि ओएमजी २ ची वातावरण निर्मिती अजूनही कायम आहे. गदर २ पाहण्यासाठी प्रेक्षक गर्दी करत आहे. त्यामुळे येत्या काळात आयुषमानला स्वताची छाप उमटविण्यासाठी मोठी फाईट द्यावी लागणार आहे



# करिना कपूर झाली भावूक

भारताचं महत्वाकांक्षी चांद्रयान ३ सध्या चंद्राच्या कक्षेत फिरत आहे. दोन दिवसांनी अर्थात २३ ऑगस्ट रोजी हे यानं चंद्रावर सॉफ्ट लँडिंग करणार आहे. इस्त्रोसह प्रत्येक भारतीयांसाठी हा अभिमानाचा क्षण असणार आहे. त्यामुळं सध्या या विषयाची देशभरात चर्चा आहे. यामध्ये बॉलिवूड अभिनेत्री करीना कपूर हीनं देखील प्रतिक्रिया दिली आहे.एका प्रमोशन पत्रकार परिषदेत करीनाला पत्रकारांनी चांद्रयान ३ बद्दल विचारलं. यावरनं तिनं हा अभिमानाचा क्षण असल्याची प्रतिक्रिया दिली. तसेच चांद्रयान ३ चंद्रावर उतरण्याचा क्षण हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा क्षण आहे. आपल्याला हृदयातून याचा अभिमान वाटावा असा हा सोहळा असेल. सध्या प्रत्येक भारतीय याच्या प्रतिक्षेत आहे. मी देखील माझ्या मुलांसोबत हा क्षण अनुभवणार आहे, असं करीनानं म्हटलं आहे. पृथ्वीचा उपग्रह असलेल्या चंद्राचा अभ्यास करण्यासाठी भारतानं आजवर तीन महत्वाकांक्षी मोहिमा लॉन्च केल्या आहेत. या मोहिमांना चंद्रयान-१, चांद्रयान-२ आणि चांद्रयान-३ अशी नावं देण्यात आली. यांपैकी पहिली चांद्रयान १ मोहिम २२ ऑक्टोबर २००८ रोजी लॉन्च करण्यात आली होती. चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळील शॅकलटन क्रेटर इथं या यानातील प्रोब आदळला होता. या यानाचा कार्यकाळ दोन वर्षांचा होता. या काळात या प्रोबकडून चंद्राच्या पृष्ठभागाचे सर्वेक्षण करून त्याचा संपूर्ण रासायनिक नकाशा तयार करणं तसेच चंद्राच्या संरचनेचा त्रिमितीय नकाशा तयार करण्याचं काम केलं.त्यानंतर भारतानं चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग करण्याची महत्वाकांक्षी मोहिम आखली. ही मोहिम इस्रोद्वारे २२ जुलै २०१९ रोजी लॉन्च करण्यात आली. भारताची ही मोहिम अयशस्वी ठरली होती. कारण या यानातील विक्रम लँडरचं चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर सॉफ्ट लँडिंग करण्यात येणार होतं. पण लँडर या प्रक्रिये दरम्यान, आदळल्यानं त्याचे तुकडे झाले होते.

# समीर चौघुलेने दिली आनंदाची बातमी!

महाराष्ट्राची हास्यजत्रा हा छोट्या पडद्यावरील लोकप्रिय शो. हास्यजत्रेतील सगळे कलाकार प्रेक्षकांच्या खास आवडीचे. अशातच महाराष्ट्राची हास्यजत्रामधील सर्वांचा लाडका अभिनेता समीर चौगुलेने सर्वांना आनंदाची बातमी दिलीय.आमच्या हास्यजत्रेत नवीन अभिनेत्याचे पदार्पण..... अशी पोस्ट करत समीर चौगुलेने एक खास फोटो शेअर केलाय. कोण आहे हा खास पाहुणा? आम्ही तुम्हाला सांगतो.महाराष्ट्राची हास्यजत्रा या शोमध्ये समीर चौगुले विविध स्कीट करुन लोकांना खळखळुन हसवतो. या शोच्या सेटवरील एक फोटो शेअर करत समीर चौगुलेने सर्वांना आनंदाची बातमी दिलीय.



# आशिया कपसाठी टीम इंडियाची घोषणा

## » राहुल आणि अय्यरसह एका खेळाडूची सरप्राईज एन्ट्री

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**येत्या ३० ऑगस्टपासून बहुप्रतीक्षित असा आशिया चषक २०२३ खेळवला जाणार आहे. ही स्पर्धा पाकिस्तान आणि श्रीलंका अशा दोन देशांमध्ये खेळवली जाणार आहे. पहिला सामना ३० ऑगस्ट रोजी पाकिस्तान आणि नेपाळ यांच्यात होणार आहे. टीम इंडिया आपला पहिला सामना २ सप्टेंबरला पाकिस्तानविरुद्ध खेळणार आहे.**



टीम इंडियाचा पाकिस्तान आणि नेपाळसह अ गटात समावेश आहे. अफगाणिस्तान, बांगलादेश आणि श्रीलंका ब गटात आहेत. या आशिया चषकासाठी बीसीसीआयचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर आणि कर्णधार रोहित शर्मा यांनी पत्रकार परिषद घेऊन भारतीय संघाची घोषणा केली. अपेक्षेप्रमाणे जसप्रीत बुमराहचे संघात पुनरागमन झाले आहे, तर संघाचे नेतृत्व रोहित शर्माकडे असेल. या संघात तिलक वर्माची सरप्राईज एन्ट्री झाली आहे. नवी दिल्लीत निवड समितीच्या बैठकीनंतर कर्णधार रोहित आणि मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी पत्रकार परिषदेत १७ सदस्यीय संघाची घोषणा केली. आशिया चषक २०२३ साठी भारतीय संघ - रोहित शर्मा (कर्णधार), इशान किशन, शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, शार्दुल ठाकूर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, संजू सॅमसन (बॅकअप). जसप्रीत बुमराह, केएल राहुल आणि श्रेयस अय्यर दीर्घ काळानंतर टीम इंडियात परतले आहेत. तिघेही दुखापतीमुळे बराच काळ संघातून बाहेर होते. बुमराहने आयर्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेत पुनरागमन केले, तर केएल राहुल आणि श्रेयस अय्यर थेट आशिया कपमध्ये खेळताना दिसतील. केएल राहुल आणि श्रेयस अय्यर यांच्या पुनरागमनावर सर्वांचे विशेष लक्ष होते. माजी भारतीय क्रिकेटपटू अजित आगरकर यांच्या अध्यक्षतेखाली शिव सुंदर दास, सुब्रतो बॅनर्जी, सलील अंकोला आणि श्रीधरन शरथ यांचा समावेश असलेल्या समितीने संघाची निवड केली आहे. कर्णधार रोहित शर्मा आणि प्रशिक्षक राहुल द्रविड यांनीही निवड बैठकीला हजेरी लावली.

### आशिया चषक 2023 साठी भारतीय संघ

» आशिया चषक २०२३ साठी भारतीय संघ - रोहित शर्मा (कर्णधार), इशान किशन, शुभमन गिल, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, शार्दुल ठाकूर, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, संजू सॅमसन (बॅकअप). जसप्रीत बुमराह, केएल राहुल आणि श्रेयस अय्यर दीर्घ काळानंतर टीम इंडियात परतले आहेत.

# याला म्हणतात रिंकू सिंग!

## » पदार्पणातच रिंकूची बॅट कडाडली

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**इंडियन प्रीमियर लीगमध्ये आपल्या कामगिरीने सर्वांना वेड लावल्यांनंतर टीम इंडियात एंट्री मिळवलेल्या रिंकू सिंगने पहिल्याच डावात आपलं फलंदाजी दाखवून दिली. आयर्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात त्याने २१ चेंडूत ३८ धावा केल्या.**



### रिंकू सिंगची आक्रमक खेळी

» ऋतुराज गायकवाड, संजू सॅमसन आणि रिंकू सिंग यांच्या आक्रमक खेळीच्या जोरावर भारताने दुसऱ्या टी-२० सामन्यात ५ गडी गमावून १८५ धावा केल्या. गायकवाडने ४३ चेंडूंत ६ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ५८ धावा केल्या, तर संजू सॅमसनने २६ चेंडूंत ४० धावा केल्या, ज्यात ५ चौकार आणि १ षटकाराचा समावेश आहे. सलामीवीर यशस्वी जैस्वालने जोश लिटलच्या चेंडूवर २ चौकार आणि १ षटकार खेचल्याने भारतीय डावाची सुरुवात अतिशय आक्रमक झाली. जैस्वालने ११ चेंडूत १८ धावा केल्या.

पाचव्या क्रमांकावर उतरलेल्या रिंकूने आधी खेळपट्टी कशी आहे समजून घेतले. सतत विकेट गमावत टीम इंडियाला सावरलं आणि एकदा सेट झाल्यावर डाव संपवूनच परतला. रिंकू आणि शिवम दुबेच्या शेवटच्या २ षटकातील फटकेबाजीमुळे भारतीय संघाची धावसंख्या १८३ पर्यंत पोहोचली. त्यामुळेच भारतीय संघाला या सामन्यात ३३ धावांनी मोठा विजय मिळवण्यात यश आले आणि सोबतच मालिकाही आपल्या नावे केली. रिंकूने आपल्या परिचित शैलीत शेवटच्या षटकात उत्कृष्ट खेळी करत टीम इंडियाला आयपीएलमधील फलंदाजीची आठवण करून दिली. रिंकूने अवघ्या २१ चेंडूत ३८ धावा केल्या, ज्याच्या जोरावर टीम इंडियाला १८५ धावांपर्यंत मजल मारता आली. आयपीएलमध्ये सलग ५ षटकार मारणाऱ्या रिंकूने मालाहाइडमध्येही ३ षटकार मारले. रिंकू सिंगला केवळ २१ चेंडू खेळण्याची संधी मिळाली आणि त्या २१ चेंडूत त्याने पुन्हा एकदा सर्वांचे मन जिंकले. एवढेच नव्हे तर त्याला आयर्लंडविरूध्दच्या दुसऱ्या टी-२० सामन्याचा सामनावीर म्हणूनही घोषित करण्यात आले. रिकूने १८०.९५ च्या स्ट्राइक रेटने २ चौकार आणि ३ षटकार मारत ३८ धावा केल्या. त्यानंतर त्याला भारताचा नवा फिनिशर म्हटले जात आहे. पहिल्या डावात तो अर्धशतकही ठोकेल असे वाटत होते, पण मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात तो १९.५ षटकांत झेलबाद झाला. रिंकू सिंगने आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते, परंतु त्या सामन्यात त्याला फलंदाजीची संधी मिळाली नाही. रिंकू आणि शिवम दुबे यांनी १९व्या आणि २०व्या षटकात अनुक्रमे २२ आणि २० धावा केल्या.

# भारताने आयर्लंडविरुद्धची मालिका घातली खिशात

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

भारताने आयर्लंडविरुद्धची तीन सामन्यांची टी-२० मालिका जिंकली आहे. दुसऱ्या टी-२० सामन्यात १८६ धावांच्या प्रत्युत्तरात आयर्लंडला केवळ १५२ धावा करता आल्या. जसप्रीत बुमराहच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाकडे आता २-० अशी अभेद्य आघाडी आहे. पहिल्या डावात २१ चेंडूत ३८ धावा करणाऱ्या उत्तर प्रदेशच्या रिंकू सिंगला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला आहे. ऋतुराज गायकवाडच्या अर्धशतकी खेळीनंतर कर्णधार जसप्रीत बुमराह, प्रसिद्ध कृष्णा आणि रवी बिश्नोई यांच्या नेतृत्वाखालील प्राणघातक गोलंदाजीच्या बळावर भारतीय संघाने आयर्लंडविरुद्धचा दुसरा टी-२० सामना जिंकला.

३३ धावांनी विजय मिळवून मालिका खिशात घातली. अँड्र्यू बालबर्नीने ७२ (५१) अशी शानदार खेळी खेळली. भारताकडून बुमराह, कृष्णा आणि बिश्नोई यांनी २-२ बळी घेतले. भारताचा नवा फिनिशर म्हटले जात आहे. पहिल्या डावात तो अर्धशतकही ठोकेल असे वाटत होते, पण मोठा फटका मारण्याच्या प्रयत्नात तो १९.५ षटकांत झेलबाद झाला. रिंकू सिंगने आयर्लंडविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यातून आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले होते, परंतु त्या सामन्यात त्याला फलंदाजीची संधी मिळाली नाही.

रिंकू आणि शिवम दुबे यांनी १९व्या आणि २०व्या षटकात अनुक्रमे २२ आणि २० धावा केल्या. त्याच्याशिवाय संजू सॅमसनने २६ चेंडूत ४० धावा, रिंकू सिंगने २१ चेंडूत ३८ धावा केल्या. तसेच शिवम दुबेने १६ चेंडूत २२ धावा केल्यानंतर तो नाबाद राहिला. आयर्लंडकडून बॅरी मॅकार्थीने चार षटकांत ३६ धावांत दोन बळी घेतले.

तर मार्क एडर, क्रेग यंग आणि बेंजामिन व्हाईट यांना प्रत्येकी एक यश मिळाले. या मालिकेतील शेवटचा सामना २३ ऑगस्ट रोजी होणार आहे. हा सामना आता केवळ औपचारिकता राहील. कारण ३३ धावांनी विजय मिळवून युवा भारतीय संघाचा आत्मविश्वास सातव्या गगनावर आहे.